**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेसनोट** दिनांक : १२/०८/२०२३

# हातभट्टी निर्मूलनासाठी महिला पोलीसांची जिल्हयातील दुर्गम भागात कारवाई

---

जिल्ह्यातील अवैध दारू विक्री उत्पादनाची ठिकाणे उध्वस्त करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी मागील काही महिन्यांपासून व्यापक शोध मोहीम हाती घेतली आहे. सदर कारवाईदरम्यान पोलीसांनी जिल्ह्यात दुर्गम ठिकाणी चालणा-या अवैध हातभट्टी व्यवसायांची ठिकाणे उध्वस्त केली आहेत. त्याचप्रमाणे अशा हातभट्ट्यांना कच्चामाल पुरवणा-या पुरवठादारांवर देखील मोठ्या कारवाया केल्या आहेत.

ग्रामीण भागातील हातभट्ट्यांची अशी ठिकाणे व अवैध दारूची विक्री ठिकाणे नेस्तनाबूत करण्यासाठी आता नाशिक ग्रामीण घटकातील महिला अंमलदारांची ०४ पथके कार्यान्वीत करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकात ८ महिलांचा समावेश करण्यात आला असून अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे पथकांचे कामगिरीवर देखरेख करत आहेत.

दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी पासून सदर पथकांनी नाशिक ग्रामीण हद्दीतील इगतपुरी व त्रंबकेश्वर तालुक्यातील खेडभैरव, देवाचीवाडी, पिंपळगाव घाडगा, चिंचलेखैरे, देवळे, तळेगाव अशा दुर्गम ठिकाणांवर जाऊन गावठी दारू हातभट्टीचे अड्डे उध्वस्त केलेले आहेत. सदर कारवाईत १,५८,०००/- रुपये किंमतीची हातभट्टीची दारू व रसायन जप्त करण्यात आले असून संबंधीतांविरुद्ध इगतपुरी, घोटी, वाडीव-हे व त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस कलम ६५(फ) दारूबंदी कायद्यानुसार एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

महिला पोलीसांच्या सदर कारवाईस जिल्ह्यातील पोलीस पाटील व नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.